**मा. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर गेवराई यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा क्र.२१०/२०२१**
**रंजीत वि. शेषराव व इतर**
**निशाणी क्र.१ वरील आदेश**
**(CNR NO.MHBI110012592021)**

०१. सदर प्रकरणातील अभिलेखाची पाहणी केली असता निशाणी क्र.१ वर दिनांक २७/०९/२०२१ रोजी आदेश करण्यात आला की, सदर प्रकरणात प्रतिवादी हे हजर झाले परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत दाखल केले नाही म्हणुन सदरचे प्रकरण हे त्यांचे म्हणणे विना चालविण्यात यावे.

०२. आज रोजी अभिलेखाची पाहणी केली असता सदर प्रकरणात एकुण पाच प्रतिवादी असुन सदर दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर त्यापैकी प्रतिवादी क्र.१ व ४ हे दिनांक ३०/०४/२०२१ रोजी विधीज्ञ श्री. एस.पी.येवले यांचे मार्फत हजर झाले. परंतु त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कायद्यातील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीत त्यांचे लेखी कैफियत किंवा म्हणणे सादर केलेले नाही.

०३. दाव्यातील प्रतिवादी क्र.२, ३ व ६ यांना निशााणी क्र.१८ प्रमाणे दाव्याचे समन्स प्राप्त झाले परंतु तरी देखील ते दाव्यात हजर झाले नाही त्यामुळे सदरचा त्यांचे विरुध्द एकतर्फी चालविणे न्यायोचीत होईल.

०४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.५ यांना अद्याप दाव्यातील समन्स हे प्राप्त झाले नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.५ बाबत समन्स तामील करणेकामी उचीत दखल घेणेबाबत निर्देश करणे उचित होईल करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी विहीत मुदतीत त्यांचे लेखी कैफियत किंवा म्हणणे सादर केलेले नाही त्यामुळे सदर प्रकरण हे त्यांचे म्हणणे विना चालविण्यात यावे.

२. प्रतिवादी क्र.२, ३ व ६ यांना दाव्याचे समन्स प्राप्त होउन देखील ते प्रकरणात हजर झाले नाही म्हणुन प्रकरण त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात यावे.

३. वादी यांना आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.५ यांना दाव्याचे समन्स तामील नसल्यामुळे योग्य ती दखल घ्यावी.

SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2022.02.16 12:10:07 +0530

दिनांक :— १५/०२/२०२२

( एस.एम.घुगे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गेवराई

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original order.

Dictated on : 15/02/2022

Transcribed on : 15/02/2022

Checked & signed on : 15/02/2022

sd./-
( M.L. Rathod )
Stenographer Grade-3, Georai.

Date: 15/02/2022